## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## सुचना

संदर्भ :- १) जाहीरात क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१२ दिनांक २४ मार्च २०१२.

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत संदर्भांकित वरील जाहिरातीनुसार सहायक कुलसचिव/सहायक नियंत्रक तसेच प्रयोगशाळा परिचर या पदांवर नियुक्ती करण्याकरीता एमकेसीएल यांचेकडे ऑनलाईन अर्ज भरलेल्या व विद्यापीठास प्राप्त झालेल्या यादीनुसार सर्व उमेदवारांना सहायक कुलसचिव/सहायक नियंत्रक तसेच प्रयोगशाळा परिचर पदाचे लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) एम.के.सी.एल., पुणे यांचे संकेतस्थळ **http://oasis.mkcl.org/pdkv** **दिनांक १०-०३-२०१५ ते २२-०३-२०१५** दरम्यान डाउनलोड केल्यास उपलब्ध होईल. उमेदवारांना प्रवेशपत्राशिवाय (Hall Ticket) परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदर सर्व उमेदवारांची लेखी परिक्षा त्यांचे आसन क्रमांकानुसार खालील नमुद केंद्रावर आयोजित केलेली आहे. तसेच या पदांसाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांची यादी एम.के.सी.एल, पुणे तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव आणि परिक्षेची तारीख | परिक्षा केंद्राचे नांव | आसन क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | **सहायक कुलसचिव/सहायक नियंत्रक**<br>दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी<br>**सकाळी ११.०० ते ०१.००** | कृषि महाविद्यालय,<br>डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला | ००१ ते २२७ |
| २. | **प्रयोगशाळा परिचर**<br>दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी<br>**दुपारी ०३.०० ते ०५.००** | १. आर.एल.टी.सायन्स कॉलेज,<br>सिव्हील लाईन, अकोला. | १ ते ६२७ |
| | | २. एल.आर.टी.कॉमर्स कॉलेज,<br>सिव्हील लाईन, अकोला. | ६२८ ते १३२७ |

संबंधित उमेदवारास विद्यापीठाने वरील पदासाठी पाठविण्यात आलेले **प्रवेशपत्र न मिळाल्यास** त्यांनी स्वतःचे नांव, जन्म तारीख व पत्ता असलेले फोटाओळखपत्र सोबत आणुन दिनांक २० मार्च, २०१५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३.०० या दरम्यान कुलसचिव कार्यालयामधील आस्थापना विभागातून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे. म्हणजे त्यांना लेखी परिक्षेस बसण्यास अडचण जाणार नाही.

उपरोक्त पदांकरिता लेखी परिक्षेचा अभ्यासक्रमाबाबत सविस्तर तपशिल एम.के.सी.एल, पुणे व विद्यापीठ संकेतस्थळ **www.pdkv.ac.in** वर उपलब्ध करण्यात आला आहे.

उपरोक्त पदाच्या लेखी परिक्षेनंतर उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी करण्यात येणार असुन एखादा उमेदवार प्रमाणपत्र पडताळणी दरम्यान अपात्र आढळल्यास त्याची लेखी परिक्षेतील गुणवत्ता ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र असला तरी अशा उमेदवारांना निवड प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांचे प्रमाणपत्र पडताळणीबाबतचे वेळापत्रक नंतर विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग प्रानिमं-२००७/प्र.क्रं ४६/०७/१३-अ दिनांक २७ जुन २००८ नुसार सदर लेखी परिक्षेस बसलेल्या उमेदवारांनी लेखी परिक्षमध्ये ४५% व त्या पेक्षा जास्त गुण प्राप्त उमदेवारांची गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. तसेच शासन निर्णय दिनांक १२ मार्च २०१३ व ०५ जुन २०१४ नुसार सहायक कुलसचिव/सहायक नियंत्रक तसेच प्रयोगशाळा परिचर या पदांवर संबंधित उमेदवारांची निवड उमेदवाराने लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणावर, गुणवत्तेनुसार,मुलाखतीविना करण्यात येईल.

सदर पदावरील नियुक्ती,भरती प्रक्रीया व त्याकरता आयोजित लेखी परीक्षा अत्यंत पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येत असल्यामुळे प्रक्रीये दरम्यान वा नंतर कोणी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविल्यास किंवा त्यासाठी पैशाची मागणी केल्यास संबंधित उमेदवारांनी अशा व्यक्तीचा/व्यक्तीची थेट नजीकच्या पोलीस स्टेशनला तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे आवश्यक पुराव्यासह तक्रार दाखल करावी व त्याबाबतची माहिती कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना कळवावी.

कृपया संबंधितांनी वरील बाबींची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७ मार्च, २०१५

**कुलसचिव**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**